हे अल्लाह मी एक सामान्य मनुष्य आहे, ज्या मुस्लीमाला माझ्या मुळे काही त्रास झाला, किंवा एखाद्या व्यक्तीवर मी रागावलो असेल, किंवा शाप दिला असेल, किंवा कुणाला ईजा पोहचवली असेल, तर त्याच्या करिता शुद्धता व पवित्रता तसेच त्याबदल्यात त्याच्यावर क्रॄपावर्षाव कर

अबुहुरैरा रजिअल्लाहु अनहु वर्णन करतात की: प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम
नी फरमाविले आहे की: <>. [صحيح] [متفق عليه]

पैगंबरांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी सर्वोच्च अल्लाह कडे दुआ याचना केली आहे की, हे अल्लाह! मी सुद्धा एक मनुष्य आहे, जसा राग सगळयांना येतो, तसाच मला सुद्धा राग येतो, बस्स ज्या कुण्या ईमानधारकाला माझ्याकडुन ईजा पोहचली असेल, किंवा त्याला बरेवाईट बोललो असेल, किंवा शीवीगाळ केली असेल किंवा एखाद्याला शाप दिला असेल, (अर्थात तुझ्या क्रॄपेपासुन वंचित होण्याचा शाप दिला असेल) किंवा त्याला मारहाण केली असेल तर हे अल्लाह! त्याच्या मोबदल्यात त्याला (जकात) दानधर्म, जवळीकता, तसेच शुद्धता व पापापासुन मुक्ती चे साधन बनव, व क्रॄपा बनवुन दे, अशी क्रॄपा ज्यामुळे तु क्रॄपा करतोस.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/65812